NUTA BULLETIN
OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION
Regd. No. MAHBIL/2001/4448 : Licensed to post without prepayment No. NR/ATI/78/2001
YEAR : 33 ) 15th June 2008 ( No : 05

# MINUTES

**of the General Body Meeting of NAGPUR UNIVERSITY TEACHERS'ASSOCIATION held at 12.00 noon on *SUNDAY, the***

## *25 th May, 2008 at* G.S. Science, Arts & Commerce College, KHAMGAON

General Body of Nagpur University Teachers' Association met at 12.00 noon on Sunday, the 25th May 2008 at G.S. Science, Arts & Commerce College, KHAMGAON Prof. B.T.Deshmukh, President was in the chair. The membership numbers of the members present at the meeting are as follows :-

0044, 0048, 0090, 0072, 0173, 0389, 0456, 0633, 0754, 1062, 1113, 1122, 1161, 1392, 1406, 1518, 1792, 1793, 1798, 1849, 1948, 2009, 2035, 2038, 2100, 2108, 2138, 2426, 2495, 2503, 2508, 2524, 2603, 2757, 2855, 2867, 2885, 2994, 2998, 3094, 3095, 3097, 3098, 3117, 3149, 3250, 3259, 3300, 3303, 3319, 3328, 3331, 3335, 3336, 3337, 3341, 3344, 3399, 3427, 3432, 3437, 3464, 3471, 3480, 3483, 3484, 3495, 3498, 3508, 3512, 3519, 3550, 3563, 3586, 3619, 3692, 3701, 3706, 3769, 3898, 3916, 3659, 3975, 4018, 4019, 4024, 4026, 4038, 4076, 4139, 4149, 4239, 4396, 4420, 4426, 4437, 4506, 4509, 4630, 4637, 4690, 4782, 4846, 4955, 5102, 5012, 5137, 5164, 5166, 5167, 7504,

Agenda of the General Body meeting was circulated on pages 41 to 43 of 2008 NUTA Bulletin. Additional Agenda was circulated to the members as on pages 21 to 28 of 2008 Ex-File.

## ITEM NO. 460 :
### *CONFIRMATION OF MINUTES :*

**CONFIRMED** the minutes of the General Body meeting of Nagpur University Teachers' Association held at 12.00 noon on Sunday, the 2nd December 2007 at Bhartiya Mahavidyalaya, Amravati.

*Notes :- 1) Copy of the minutes was Circulated on pages 157 to 158 of 2007 NUTA Bulletin.*

*2) Corrections, if any, were invited in the copy of the Minutes of the General Body Meeting of Nagpur University Teachers'Association held at 12.00 noon on Sunday, the 2nd December 2007 at Bhartiya Mahavidyalaya, Amravati. vide No.CIM/24 Dated 15th December, 2007 published on page 158 of 2007 NUTA Bulletin. No correction was received.*

## विषय क्रमांक ४६१ (अ) :
### *संघटनेचे संस्थापक सचिव प्रा. र.वि.रानडे यांच्या दुःखद निधनाबद्दल शोक प्रस्ताव*

प्रा. र.वि.रानडे यांच्या दुःखद निधनाबद्दल डॉ.ई.एच.कठाळे यांनी मांडलेला पुढील शोकप्रस्ताव **सम्मत करण्यात आला.** *:-*

"रा.तु.म. नागपूर विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागातील माजी प्रपाठक प्रा. र. वि. रानडे यांचे १४ मार्च २००८ रोजी पुणे येथे वयाच्या ८३ व्या वर्षी दुःखद निधन झाले. प्रा. रानडे यांनी सुरुवातीला नागपूर येथील धनवटे नॅशनल कॉलेज मध्ये व नंतर एस.बी.सी.टी कॉलेज येथे प्राध्यापक म्हणून कार्य केले. प्रा. रानडे सुरुवातीला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ते होते. नंतर त्यांचा कॉम्रेड डांगे, इतिहासकार सेतु माधवराव पगडी, भाई बर्धन इत्यादींशी संबंध आल्यामुळे ते साम्यवादी विचारांचे प्रभावी विचारवंत म्हणूनच ओळखले जाऊ लागले. शिक्षक चळवळीमध्ये तर त्यांचा महत्वपूर्ण सहभाग राहिलेला आहे. 'नुटा' ची स्थापना होण्यापूर्वी ते युनिव्हर्सिटी टीचर्स क्लबचे संयोजक होते. त्यांच्या अथक व नियोजित प्रयत्नामुळे पुढे नुटाची १७ मार्च १९६३ रोजी स्थापना झाली. 'नुटा' संघटनेचे ते संस्थापक सचिव होते. पुढे सलग ३ वर्षे त्यांनी नुटाचे सचिव म्हणून कार्य केले.

मार्च १९८८ मध्ये नुटाच्या स्थापनेला २५ वर्षे पूर्ण होत असल्यामुळे नुटा कार्यकारिणीने संघटनेचा रौप्य महोत्सव साजरा करण्याचा व त्या निमित्ताने नुटाच्या स्थापनेपासूनच्या सर्व माजी अध्यक्ष व सचिवांचा सत्कार करण्याचा निर्णय घेतला होता. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी त्यावेळी अनेक माजी पदाधिकाऱ्यांच्या प्रत्यक्ष भेटी घेऊन माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला. रानडे सरांची भेट घेऊन त्यांचेकडून माहिती घेण्याचे कार्य माझ्याकडे सोपविण्यात आले होते. रानडे सरांशी फोनवर संपर्क करुन त्यांनी दिलेल्या दिवशी व वेळी त्यांचे निवासस्थानी मी पोहचलो. प्रास्ताविक चर्चेनंतर एक प्रोफॉर्मा त्यांचे समोर ठेवला व त्यामध्ये आपण माहिती भरुन द्यावी अशी विनंती केली. "कठाळे तुमच्या या लहानशा प्रोफॉर्म्यामध्ये कितीशी माहिती बसणार?" अशी सरांनी पृच्छा केली. "तुम्ही आलात बरे झाले, माझ्याजवळ नुटाच्या स्थापनेच्या संदर्भात कागदपत्रे आहेत. मी आता ती कोणाकडे द्यावी? असा प्रश्न होताच. तुम्ही ती घ्या आणि त्याचा काय उपयोग होतो ते बी.टी.शी बोलून ठरवा" असे म्हणून त्यांनी माझे जवळ अतिशय महत्वाची नुटाच्या स्थापनेपूर्वीपासूनची अत्यंत परिश्रमपूर्वक तयार केलेली व जोपासून ठेवलेली फाईल दिली. संघटनेचे अध्यक्ष प्रा. बी.टी.देशमुख ह्यांना ताबडतोब त्याबद्दल कळविले आणि यथावकाश ती फाईल त्यांचे सुपुर्द केली. पुढे त्याच फाईलच्या आधारावर सन २००१ मध्ये संघटना-संस्थापना विशेषांक ('नुटा बुलेटीन' रौप्य महोत्सवी विशेषांक मालिका : विशेषांक नववा : सन २००१ चा अठरावा") प्रकाशित करण्यात आला. त्या विशेषांकाची सर्व मुद्रीते त्यांनी काळजीपूर्वक तपासून दिलीत. त्या अंकाला त्यांच्याकडून प्रस्तावना घ्यावी असे प्रस्तावित होते. त्यासाठी त्यांचे डागा ले आऊट येथील निवासस्थानी अनेकदा जाऊन आलो. परंतु प्रत्येक वेळी त्यांचे घर बंद दिसायचे, नंतर सर पुण्याला स्थायिक झाल्याचे कळले.

सर, शिक्षक चळवळीतील आदर्श नेतृत्व होते. ते नागपूर विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे सदस्य होते. विद्वतपरिषदेवर, विधीसभेवर व कार्यकारिणीवर सदस्य म्हणून सुद्धा त्यांनी कार्य केले. या सर्व प्राधिकारिणीवर कार्य करीत असतांना त्यांनी स्वतःचा एक अमिट ठसा उमटविला. निवृत्तीनंतरही ते शिक्षक संघटनेच्या अनेक आंदोलनाशी निगडीत राहीले. त्यांच्या दुःखद निधनामुळे शिक्षक चळवळीचे कधीही भरुन न येणारे नुकसान झाले आहे. या संघटनेच्या स्थापनेच्या कालखंडातील घटनाक्रमांशी संबधित सर्व कागदपत्रे निटपणे लावून ठेवणे, अनेक वर्षे ती काळजीपूर्वक जपून ठेवणे व योग्य वेळी ती योग्य पदाधिकाऱ्यांच्या स्वाधिन करणे या महत्वपूर्ण योगदानाचे धनी व संघटनेचे संस्थापक सचिव प्रा.र.वि. रानडे यांना नुटाची ही आमसभा आदरपूर्वक अभिवादन करीत आहे व त्याच्या दुःखद निधनाबद्दल शोक संवेदना व्यक्त करीत आहे.

## विषय क्रमांक ४६१ (ब) :
### *प्रा.नरेंद्र कुकडे यांच्या दुःखद निधनाबद्दल शोकप्रस्ताव*

प्रा.नरेंद्र कुकडे यांच्या दुःखद निधनाबद्दल डॉ.ई.एच.कठाळे यांनी मांडलेला पुढील शोकप्रस्ताव **सम्मत करण्यात आला.** :-

"शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघाचे (सुटा) माजी अध्यक्ष व सुटा विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष प्रा. नरेंद्र कुकडे यांचे २९ फेब्रुवारी २००८ रोजी वयाच्या ७२ व्या वर्षी दुःखद निधन झाले. प्रा. कुकडे पुरोगामी विचाराचे होते. मागील ७-८ वर्षापासून ते पार्किन्सन ह्या आजारामुळे आजारी होते. ऑपरेशन नंतर त्यांची प्रकृती खालावत गेली व त्यातच त्यांचे दुःखद निधन

झाले.

प्रा. नरेंद्र कुकडे यांचा जन्म १९३५ मध्ये झाला. त्यांनी नागपूर येथील जी.एस.कॉलेज मधून १९५९ साली एम.कॉम. पदवी घेऊन प्राध्यापक म्हणून जीवनास सुरुवात केली. सुरवातीला ते नागपूर येथील धनवटे कॉलेज येथे प्राध्यापक होते. त्यानंतर गडहिंग्लज व नारनानगर व शेवटी शिवाजी विद्यापीठ क्षेत्रातील देवचंद महाविद्यालय, अर्जूननगर (जि. कोल्हापूर) येथे प्राध्यापक म्हणून रुजू झाले व त्याच महाविद्यालयामधून दीर्घ सेवेनंतर १९९५ मध्ये सेवानिवृत्त झाले.

विद्यार्थी दशेपासून ते चळवळी मध्ये सक्रिय होते. प्राध्यापक म्हणून त्यांनी 'सुटा' संघटनेमध्ये सक्रियपणे काम करुन 'सुटा' चे अध्यक्षपद भूषविले. शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेवर व विद्यापीठाच्या कार्यकारिणीवरही त्यांनी काम केले. शिक्षकांचे हितसंबंध जोपासतांना त्यांनी विद्यार्थ्यांच्या हितसंबंधाकडे व एकंदरच शिक्षणाच्या शुद्धिकरणाकडे विशेष लक्ष पुरविले. एक निष्ठावान, प्रामाणिक विचारांचा, कृती कार्यक्रमावर भर देणारा अन्याया विरुद्ध लढणारा, पुरोगामी विचारांचा परिवर्तनवादी लढवय्या म्हणून त्यांची ओळख होती.

प्राध्यापकांच्या प्रश्नाशिवाय शेतकऱ्यांचे तंबाखू आंदोलन, देवदासी आंदोलन, बिडी कामगारांचा लढा, स्त्री मुक्ती लढा इत्यादी अनेक चळवळीत त्यांचा सहभाग होता. गोवा मुक्ती संग्रामामध्ये सुद्धा त्यांनी भाग घेतला होता. त्यांच्या नेतृत्वाखाली सुटा क्षेत्रातील अनेक महाविद्यालयातील आंदोलने यशस्वीपणे लढविल्या गेलीत. त्यांच्या निधनाने एक जहाल विचारांचा मार्गदर्शक काळाच्या पडद्याआड गेलेला आहे. नुटाची ही आमसभा प्रा. नरेंद्र कुकडे यांचे दुःखद निधनाबद्दल शोक संवेदना व्यक्त करीत आहे व नुटाचे सर्व सदस्य, पदाधिकारी प्रा. कुकडे यांच्या कुटूंबियांच्या दुःखामध्ये सहभागी आहे."

**विषय क्रमांक ४६१ (क) :**
***प्रा.भाऊ मांडवकर यांच्या दुःखद निधनाबद्दल शोकप्रस्ताव***

डॉ.भाऊ मांडवकर यांच्या दुःखद निधनाबद्दल प्रा.एस.टी.सांगळे यांनी मांडलेला पुढील शोकप्रस्ताव **सम्मत करण्यात आला.** :-

" साहित्य क्षेत्रात आपल्या लेखणीद्वारे सामान्यांच्या तथा आदिवासींच्या प्रश्नांना वाचा फोडणारे, संघटनेचे आजिव सदस्य डॉ. भाऊ मांडवकर यांचे दिनांक २७.४.२००८ रोजी वयाच्या ७८ व्या वर्षी दुःखद निधन झाले.

यवतमाळ जिल्ह्यातील कळंब या गावी सर्वसामान्य कुटूंबात डॉ. भाऊ मांडवकर यांचा ७ मे १९३० रोजी जन्म झाला. अत्यंत प्रतिकुल परिस्थितीशी सामना करीत त्यांनी मराठी या विषयात एम.ए. पर्यंत शिक्षण घेतले. विद्यार्थी दशेपासूनच कथा, कविता, लेख लिहिणाऱ्या डॉ. भाऊ मांडवकर यांनी १९६९ साली आदिवासींच्या जीवनावर "कोलाम" हा ग्रंथ लिहीला. या त्यांच्या लिखाणाबद्दल नागपूर विद्यापीठाने त्यांना आचार्य पदवी बहाल करुन त्यांच्या आदिवासी सेवेचा गौरव केला. त्यांच्या याच कार्याबद्दल महाराष्ट्र शासनाने त्यांना 'आदिवासी सेवक' पुरस्कार देवून गौरवांकित केले आहे. साहित्य क्षेत्रातले त्यांचे योगदान उल्लेखनिय आहे. १२५ पुस्तके लिहिणारे भाऊ मांडवकर हे त्या पिढीतील विदर्भातील पहिले साहित्यीक होत.

डॉ. भाऊ मांडवकर यांनी चंद्रपूर येथील जनता महाविद्यालय, यवतमाळ येथील अमोलकचंद महाविद्यालय, अमरावती येथील श्री. शिवाजी महाविद्यालय येथे प्राध्यापक म्हणून तर गडचिरोली येथील शिवाजी महाविद्यालय, चांदूर बाजार येथील गो.सी.टोम्पे महाविद्यालय, अमरावती येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय येथे प्राचार्य म्हणून कार्य केले आहे.

१९८३ मध्ये त्यांनी कळंब येथे इंदिरा गांधी महाविद्यालय स्थापन करुन महाविद्यालयाचे संस्थापक प्राचार्य म्हणून त्यानंतर अनेक वर्षे कार्य केले. नागपूर विद्यापीठाच्या विविध प्राधिकारीणीवर त्यांनी कार्य केले असून ते नागपूर विद्यापीठाच्या कार्यकारिणीचे सदस्य होते तसेच अनेक साहित्य सम्मेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले होते. साहित्य, शिक्षण व सामाजिक क्षेत्रात आपल्या भरीव कार्याने ठसा उमटविणारे डॉ. भाऊ मांडवकर संघटनेच्या कार्यात देखील सक्रिय सहभागी असायचे. नुटा संघटनेच्या अनेक आंदोलनामध्ये त्यांनी सक्रिय सहभाग दिलेला होता.

डॉ. भाऊ मांडवकर यांच्या निधनामुळे विदर्भातील साहित्य, सामाजिक व उच्च शिक्षण क्षेत्राचे कधीही भरून न निघणारे नुकसान झाले आहे.

# IN THE HIGH COURT OF JUDICATURE, AT BOMBAY NAGPUR BENCH, NAGPUR

## WRIT PETITION NO. 2326/2008

Dr.Wasudeo s/o Raghunath Bhandarkar and 16 others. (All petitioners names are typed on back page)
**Applicant/Appellant**
**VS.**
The State of Maharashtra, Finance Department, Mantralaya, Mumbai Through its Secretary and others
**Opponent/Respondent**

To,

R-9, SSJ College, Arjuni Morgaon, Dist. Gondia, Through its Principal

Upon reading the petition of the Applicant presented to this High Court of Judicature at Bombay On the 05-06-2008

Praying that (ii) to grant ad-interim stay to the effect and operation of orders/communications dated 10-03-2008(Annex-VI) issued by the respondent no.02 i.e. the State of Maharashtra, Higher and Technical Education Department and 10-04-2008(Annex.VII) issued by the respondent no.03 i.e. The Director of Education, during the pendency of the present petition.

And upon hearing Shri. P.C.Marpakwar, Adv., For the Petitioner, the court passes the following order.

## CORAM: D. D. SINHA & C. L. PANGARKAR, JJ
## DATE: 12TH JUNE 2008

Heard learned counsel for the petitioners. Notice returnable on 26-06-2008. The parties are directed to maintain **STATUSQUO** in the mean time.

The above court order be carried out. Witness, Shri. Swatanterkumar, Chief Justice at Bombay aforesaid this 12th June 2008.

**Names of the petitioners:** (Nos. 1 to 17) :- (1) Dr. Wasudeo s/o Raghunath Bhandarkar (2) Waman s/o Namdeo Ganvir (3) Vishnu s/o Tukaram Tembhare (4) Veerkumar s/o Neminath Mahajan (5) Vijay s/o Janardan Kavimandan (6) Baba s/o Vithoba Tijare (7) Dr. Dilip s/o Jageshwar Shrikhande( 8) Vasant s/o Waman Kharche (9) Dr. Anil so Tarachandji Jain (10) Anilkumar s/o Mathuraprasad Sharma (11) Chandrakumar s/o Mangaram Gopalani (12) Prabhakar s/o Sambhaji Hemne (13) Suresh s/o Vitthaldas Gandhi (14) Murlidhar s/o Laxman Bhave (15) Smt. Ratnaprabha w/o Ram Padwad (16) Dr. Nirankush s/o Vinayakarao Khumbalkar (17) Ms. Nalini d/o Madhaorao Wadajikar

नुटाची ही आमसभा त्यांच्या कुटूंबीयांच्या दुःखात सहभागी असून डॉ. भाऊ मांडवकर यांच्या दुःखद निधनाबद्दल तीव्र शोक व्यक्त करीत आहे.

**विषय क्रमांक ४६१ (ड) :**
***प्रा.आर.बी. यावले यांच्या दुःखद निधनाबद्दल शोकप्रस्ताव***

प्रा.आर.बी.यावले यांच्या दुःखद निधनाबद्दल प्रा.प्रकाश तायडे यांनी मांडलेला पुढील शोकप्रस्ताव **सम्मत करण्यात आला. :-**

प्रा.रुपराव भिमराव यावले हे श्री.शिवाजी कला वाणिज्य महाविद्यालय अमरावती येथे अर्थशास्त्र विषयाचे विभाग प्रमुख होते. त्यांचे दिनांक १८.७.२००८ रोजी वयाच्या ७६ व्या वर्षी निधन झाले. त्यांनी ३० वर्षाची प्रदीर्घ सेवा देतांना अमरावती जिल्हा नुटा युनिटचे पदाधिकारी म्हणून समर्थपणे काम पाहिले. दिवंगत यावले सरांनी नागपूर विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणांमध्ये आपल्या कार्याचा ठसा उमटविला. सामाजिक क्षेत्रातही त्यांचे भरीव काम होते. महात्मा फुले शिक्षण संस्थेचे ते अनेक वर्षे अध्यक्ष होते. संघटनेच्या सर्व निवडणूका व इतर कार्यात त्यांचा सक्रिय सहभाग होता. त्यांच्या निधनाने संघटनेची हानी झाली त्यात संशय नाही. त्यांच्या कुटूंबीयांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. ईश्वर त्यांच्या आत्म्यास सद्गती व शांती देवो, ही प्रार्थना.

**विषय क्रमांक ४६१ (इ) :**
***प्रा.पी.एम.गौरखेडे यांच्या दुःखद निधनाबद्दल शोकप्रस्ताव***

प्रा.पी,एम.गौरखेडे यांच्या दुःखद निधनाबद्दल प्राचार्य एस.बी.होटे यांनी मांडलेला पुढील शोकप्रस्ताव **सम्मत करण्यात आला. :-**

श्री. बाबासाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालय पांढरकवडा येथील वाणिज्य विषयाचे निवृत्त प्राध्यापक श्री. प्रभाकरराव मारोतराव गौरखेडे ह्यांचे दिनांक १० मे, २००८ रोजी पुणे येथे हृदय विकाराने दुःखद निधन झाले.

प्रा प्रभाकरराव गौरखेडे नुटाचे आजिवन सदस्य होते. ते उत्तम शिक्षक होते. त्यांनी अनेक ठिकाणी रांगोळीतील चित्राचे प्रदर्शन भरवून नावलौकीक मिळविला होता. त्यांनी विद्यापीठातील अभ्यास मंडळावर आणि विद्वत परिषदेवर एक शिक्षक म्हणून यशस्वी कार्य केले होते. १९७० ते २००४ ह्या दीर्घ कालावधीच्या सेवेत त्यांनी एक शिक्षक म्हणून उत्तम कामगिरी पार पाडली. ही सभा त्यांना श्रद्धांजली अर्पण करीत आहे. त्यांच्या मागे पत्नी, मुलगा व दोन मुली असून त्यांच्या दुःखात ही सभा सहभागी असून त्यांना हे दुःख सहन करण्याची शक्ती देवो अशी परमेश्वरास प्रार्थना करीत आहे.

शोकप्रस्ताव मांडणाऱ्या सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. सभाध्यक्षांनी सुद्धा आपल्या भावना व्यक्त केल्या. **सभेने दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून दिवंगत सदस्यांना आपली आदरांजली वाहिली.** सम्मत केलेल्या शोकप्रस्तावाची प्रत संघटनेच्या वतीने सचिव शोकाकुल कुटुंबियांकडे पाठवतील असे सभाध्यक्षांनी सांगितले.

**ITEM NO. 462 :**
***APPROVAL TO THE ANNUAL REPORT :***

**CONSIDERED AND APPROVED** the Annual Report regarding the working of the Association for the calendar year ending on 31st December, 2007.

***Notes :*** *(i) As per Article VI (b) (iii) of the Constitution of NUTA, the Annual Report of the working of the Associa-*

## NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

*(TRUST REG. NO. F-1594)*

**प्रा.बी.टी.देशमुख**, *अध्यक्ष* **डॉ.एस.ए.तिवारी**, *कोषाध्यक्ष* **डॉ. ई.एच.कठाळे**, *सचिव*

**Prof.B.T.Deshmukh,** *M.L.C.* 3, Subodha Colony, Near Vidarbha Mahavidyalaya, **AMRAVATI - 444 604.** * **Prof. Dr.E.H.Kathale,** Secretary, NUTA. N,162, Reshimbagh, **Nagpur.** * **Prof. Dr. S.A.Tiwari,** Treasurer, NUTA, 42, Shankar Nagar, **Amravati - 444 606.**

**Ph. No. R :** 0721 - 2530080, 022 - 22825080, **O :** 0721 - 2663646

**दिनांक : १८.०९.२००६ : क्रमांक : अ.नि. १८**

प्रति,
**मा. ॲड. श्रीहरी अणे**, मुंबई.

**संदर्भ :-** मा. मुंबई उच्च न्यायालयापुढे सुनावणीसाठी असलेले २००३ चे रिट पिटीशन क्रमांक ५८७२.

मा. महोदय,

मा. मुंबई उच्च न्यायालयासमोर संदर्भामध्ये नमूद केलेली याचिका सोमवार, दिनांक १८ सप्टेबर २००६ पासून नियमित सुनावणीसाठी येत आहे असे समजले. भारतीय संविधानाच्या खंड ३७१ (२) नुसार भारताच्या मा. राष्ट्रपतींनी काढलेले ९ मार्च १९९४ चे आदेश, त्या आदेशानुसार महाराष्ट्राच्या राज्यपालांनी निर्गमित केलेले आदेश व निदेश यांची अंमलबजावणी न होणे, त्यातून निधी वाटपासारख्या महत्वपूर्ण बाबतीत महाराष्ट्राच्या एकूणच अनुशेषग्रस्त भागाला **व मुख्यत्वे विदर्भाला सातत्त्याने मिळणारी भेदभावपूर्ण वागणूक या सारख्या महत्त्वाच्या मुद्यांचे भवितव्य या याचिकेच्या निर्णयावर अवलंबून आहे.**

२. आपल्या सारख्या समर्थ ज्येष्ठ अधिवक्त्यांनी या प्रकरणी अनुशेषग्रस्त भागाची बाजू मांडण्याचे मान्य केले आहे, त्यामुळे विदर्भातील लोकांना मनापासून आनंद झालेला आहे व आपली बाजू निश्चितच प्रभावीपणे मांडली जाईल या खात्रीपोटीच हा आनंद आहे, हे नमूद करणे आम्हाला आवश्यक वाटते. **भारतीय संविधानाच्या खंड ३७१ (२) अन्वये उपलब्ध झालेल्या यंत्रणेच्या अस्तित्वाच्या निकालाचा महत्वपूर्ण विषय या दाव्यात अंतर्भूत आहे** हे जेवढे खरे; तेवढेच सतत वाढणाऱ्या अनुशेषामुळे शेकडो शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्याची पाळी यावी, ही जी ग्रहण लागल्यासारखी स्थिती एकूणच अनुशेषग्रस्त भागात व विशेषतः विदर्भात निर्माण झालेली आहे त्यातून सुटका होण्यासाठी मदत करु शकणारा 'लहानसा प्रकाश किरण'सुद्धा या याचिकेच्या निमित्ताने आपल्या अस्तित्वासाठी लढत आहे हेही खरे आहे.

३. अनुशेषाच्या समस्येने व्यथित झालेल्या अनुशेषग्रस्त भागातील काही विधानमंडळ सदस्यांनी ही याचिका दाखल केल्यानंतर, विकसित भागातील लोकांनी त्याला विरोध करण्यासाठी ४-५ प्रतियाचिका दाखल केलेल्या आहेत. या प्रतियाचिका-कर्त्यांच्या मागे फार मोठे आर्थिक बळसुद्धा उभे करण्यात आले आहे. हे लक्षात घेता **उच्च न्यायालयात निकाल काहीही लागला तरी ही लढाई सर्वोच्च न्यायालयापर्यंत जाईल असे स्पष्टपणे दिसून येत आहे.** या विषयावर काही जाणकार लोकांशी चर्चा केली असता या याचिकेच्या मागे मजबूत आर्थिक बळ उभे करण्यात आपण कुठेही कमी पडता कामा नये अशी भावना सर्वत्र व्यक्त करण्यात आली व गरज पडल्यास सामुदायिक जोर या कामी उभा करून अशा प्रसंगी सादर होता येईल, अशी खात्रीही व्यक्त करण्यात आली. आपण स्वतः, ॲड. मधुकररावजी किम्मतकर किंवा याचिकाकर्ते विधानमंडळ सदस्य यांनी याबाबत कोणत्या अवस्थेला कोणता निर्णय घ्यावा याचे मार्गदर्शन केल्यास व केल्याप्रमाणे योग्य वेळी योग्य तो निर्णय घेण्यात आम्हाला आनंद वाटेल.

४. आज न्यायालयासमोर असलेल्या अशा याचिकांमध्ये फार मोठा आर्थिक भार सहन करावा लागतो हे सर्वविदीत आहे. अशा आर्थिक भारामध्ये ज्येष्ठ अधिवक्त्यांचा मेहनताना व येणारा अनुषंगिक खर्च (कनिष्ठ सहकारी अधिवक्त्यांच्या मेहनतान्यासह) या दोन प्रमुख बाबी असतात अशी आमची समजूत आहे. **हा आर्थिक भार उचलण्यात सर्वांनी हातभार लावला पाहिजे अशीही आमची धारणा आहे.** ज्येष्ठ अधिवक्ता या नात्याने मेहनतान्याविषयी आपण घेतलेली भूमिका आमच्या संघटनेचे अध्यक्ष प्रा.बी.टी.देशमुख व अनुशेष समस्येचे जाणकार ॲड. मधुकरराव किम्मतकर यांच्याकडून समजली. या एकूण आर्थिक भारातील अल्पसा सहभाग म्हणून रुपये २५ हजार आपणाकडे सुपूर्त करण्याचा निर्णय आमच्या संघटनेच्या कार्यकारी मंडळाने घेतला आहे. कृपया स्वीकार व्हावा अशी विनंती आहे.

५. विदर्भातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या या प्रातिनिधीक संघटनेच्या कार्यकारी मंडळाने, विचारपूर्वक उपरोक्त मजकुरासह याबाबतची भावना आपणास कळविण्याची, विनंती केल्यावरुन आपणास हे कळवित आहे. याचिकेतील यशासाठी मनापासून शुभेच्छा.

आपले विनित

**डॉ. ई.एच.कठाळे** — *सचिव 'नुटा'*
**डॉ.एस.ए.तिवारी** — *कोषाध्यक्ष 'नुटा'*

**सहपत्र :** बँक ऑफ महाराष्ट्रचा रुपये २५०००/- (पंचविस हजार) साठी काढलेला रेखांकित धनादेश क्रमांक COI No. 0997111 Dated 18th Sept. 2006.

*tion was prepared by the Executive Committee (vide item No.02 of 2008) and was placed for the approval of the General Body.*

*(ii) The Copy of the Annual Report was circulated* in 2008 *NUTA Bulletin on page 44 to 47*

*(iii) Dr. E.H.Kathale, Secretary presented the Annual Report on behalf of the Executive Committee.*

## ITEM NO. 463 :
## *APPROVAL TO THE ANNUAL BUDGET :*

**APPROVED** the Annual Budget of the Association for the Financial year commencing on 1st April, 2008.

***Notes :*** *(i) Prof. S.A.Tiwari, Treasurer, NUTA, presented the Budget on behalf of the Executive Committee.*

*(ii) The copy of the Budget was circulated on page No.45 of 2008 NUTA Bulletin.*

## ITEM NO.464 :
## *APPOINTMENT OF THE AUDITORS :*

**CONSIDERED AND APPROVED** the following resolution for the appointment of Auditors for the Financial year ending on 31st March, 2008 namely :-

**"C.R.Sagdeo & Co. Chartered Accountant "Prabha Niwas'' Nagpur be appointed as auditor for the Financial year ending on the 31st March 2008"**

***Notes :***

*(i) As per Article VII of the Constitution of NUTA the "General Body shall appoint auditors annually in the Annual Meeting of the Association.''*

*(ii) The Executive Committee resolved to recommend the above resolution, (Vide item No. 04 of 2008) which was placed before the General Body for its approval.*

*(iii) Dr. S.A.Tiwari, Treasurer, on behalf of the Executive Committee, moved the resolution.*

**विषय क्रमांक ४६७ :**

## *कमाल वेतनावर कुंठीत झालेल्या शिक्षकांना कुंठीत वेतनवाढी अमान्य करणे*

प्रा.डॉ. प्रविण रघुवंशी यांनी मांडलेला पुढील प्रस्ताव **सम्मत करण्यात आला. :-**

**प्रा.बी.टी.देशमुख,**<br>
विधानपरिषद सदस्य,<br>
३, सुबोध कॉलनी,<br>
विदर्भ महाविद्यालयाजवळ,<br>
**अमरावती.** - ४४४ ६०४

दिनांक : १६.०९.२००६<br>
क्रमांक : विपसवे / १०१<br>
फोन नं. नि. २५३००८०<br>
का.२६६३६४६

प्रति,<br>
**सचिव**, 'नुटा'

मा. महोदय,

स.न.वि.वि.

विधानपरिषद सदस्यत्वाच्या माझ्या पाचव्या कार्यकालापैकी सन २००५ हे पहिले पुर्ण वर्ष (कॅलेंडर ईयर) होय. त्या वर्षातील १२ महिन्यासाठी विधानमंडळ सदस्य या नात्याने मिळालेले वेतन (Salary) मी संघटनेच्या सुपूर्त करण्याचा निर्णय घेतला आहे.

संघटनेच्या आपल्या स्वतःच्या स्थायी उद्‌भवातून मिळणारे नियमित उत्पन्न आपला खर्च भागविण्यासाठी जेमतेम पुरणारे आहे, याची मला जाणीव आहे. अशाही स्थितीत अनुशेष निर्मूलनाच्या कामी खटपट करण्याचे जे धोरणात्मक निर्णय आपल्या संघटनेच्या कार्यकारी मंडळाने व आमसभेने घेतले आहेत त्या निर्णयांची अंमलबजावणी करण्यासाठी किंवा तत्सम कामासाठी अल्प हातभार लावण्याच्या भावनेने मी उक्त निर्णय घेतलेला आहे.

आपला विनित<br>
**(बी.टी.देशमुख)**<br>
अध्यक्ष, 'नुटा' विधानपरिषद सदस्य,

**सहपत्र** : 'कोषाध्यक्ष नुटा' या नावे रुपये २४०००/- (चोविस हजार) साठी काढलेला सेंट्रल बँक ऑफ इंडियाचा रेखाकिंत धनादेश क्रमांक ८०६९३ दिनांकित १६.०९.२००६

**(अ)** केंद्र शासकीय कर्मचाऱ्यांना जशा व ज्या प्रकारे वेतनश्रेणीच्या कमाल वेतनावर कुंठीत वेतनवाढी मंजूर करण्यात येतात तशा व त्याप्रकारे अशा कुंठीत वेतनवाढी विद्यापीठे व संलग्न महाविद्यालयातून काम करणाऱ्या शिक्षक व शास्त्रज्ञांनासुद्धा लागू करण्यात याव्या अशा प्रकारची स्पष्ट भूमिका विद्यापीठ अनुदान आयोगाने, केंद्र शासनाच्या मानव संसाधन विभागाने व कृषी विभागाने घेतलेली असतांना व २५ जानेवारी १९९९ च्या शासननिर्णयान्वये महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाने व १४ सप्टेंबर १९९९ च्या शासननिर्णयाने उच्च व तंत्रशिक्षण विभागाने घेतली असतांना, व १५ नोव्हेंबर २००३ च्या परिपत्रकान्वये उच्च शिक्षण संचालकांनी त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी केली असतांना आता १० मार्च २००८ रोजी एका कार्यासन अधिकाऱ्याने एका पत्रान्वये "कुंठीत वेतनवाढी मंजूर करण्यात आलेली योजना फक्त विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील कर्मचारी यांना लागू आहे" असा खुलासा केला असून मूळ शासन निर्णयात नसलेले "ही योजना शिक्षक कर्मचाऱ्यांना लागू नाही" असे एक वाक्य आपल्या या पोरकट पत्रामध्ये घुसडून दिले आहे. **एक म्हणजे "कर्मचारी" दुसरे म्हणजे "शिक्षकेतर कर्मचारी" व तिसरे म्हणजे "शिक्षक कर्मचारी" या तीन स्पष्ट अर्थाच्या तीन वेगवेगळ्या संज्ञा असून त्यांचे वेगवेगळे अर्थ आहेत. ते या कार्यासन अधिकाऱ्याला कळू नयेत ही दुःखाची व दुर्दैवाची गोष्ट आहे.** आपल्या कार्यासनाच्या भोवती लोकांना चकरा मारायला लावण्याच्या हौसेने एकएका नव्यानव्या आयुधांचा वापर करण्यात निष्णात असलेल्या या कार्यासन अधिकाऱ्याला, शासन निर्णयामध्ये सुधारणा करावयाची असेल तर ती शासननिर्णयानेच केली जावू शकते, कार्यासन अधिकाऱ्याच्या पत्राने नव्हे, याचेसुद्धा भान राहीले नाही, असे करणे म्हणजे कुप्रशासन आहे याचेही त्यांना ध्यान राहिले नाही, महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत "शासन व्यवहार कोषा"मध्ये Employee या शब्दासाठी 'कर्मचारी' असा शब्द योजिलेला आहे एवढेही ज्ञान या कार्यासन अधिकाऱ्याला नाही व त्यामुळे शिक्षक सुद्धा Employee आहे हे सांगण्याची पाळी यावी, हे सारेच केविलवाणे आहे.

**(ब)** केंद्र शासनाने, विद्यापीठ अनुदान आयोगाने, महाराष्ट्र शासनाच्या वित्त तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभागाने लागू केलेली कुंठीत वेतनवाढीची सुविधा काढून घेण्याच्या कोणत्याही प्रयत्नास ठामपणे विरोध करण्याचा

*राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना दिनांक १ जानेवारी, २००८ पासून महागाई भत्ता वाढ मंजूर करण्याबाबत*

## *महाराष्ट्र शासन : वित्त विभाग*

***शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : मभवा ११०८/प्र.क्र. २१/सेवा-९***<br>
***मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ दिनांक १६ मे, २००८***

**पहा :-** १) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक मभवा ११०७/ प्र.क्र.९२/सेवा-९. दिनांक २४ सप्टेंबर, २००७

### *शासन निर्णय*

राज्य शासकीय कर्मचारी व महागाई भत्ता अनुज्ञेय असणाऱ्या इतर सर्व पात्र पूर्णकालिक कर्मचाऱ्यांना महागाई भत्ता वाढ मंजूर करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

२. शासन असे आदेश देत आहे की, दिनांक **१ जानेवारी, २००८** पासून वेतनश्रेणीतील मूळ वेतन अधिक महागाई वेतनावर अनुज्ञेय महागाई भत्त्याचा दर ४१ टक्क्यावरून **४७ टक्के करण्यात यावा.**

३. महागाई भत्त्याची रक्कम प्रदान करण्यासंदर्भात विद्यमान तरतुदी व कार्यपद्धती आहे तशाच यापुढेही लागू राहतील.

४. शासकीय कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेल्या महागाई भत्त्यामुळे येणारा खर्च, हा त्यांचे वेतन व भत्ते यासंबंधीचा खर्च ज्या लेखा शीर्षाखाली खर्ची घालण्यात येतो, त्याच लेखा शीर्षाखाली खर्ची घालण्यात यावा. अनुदानप्राप्त संस्था, नगरपरिषदा व जिल्हा परिषदा यांच्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, संबंधित प्रमुख लेखा शीर्षाखालील ज्या उपलेखा शीर्षाखाली त्यांच्या सहाय्यक अनुदानाबाबतचा खर्च खर्ची घालण्यात येतो, त्या उप लेखा शीर्षाखाली हा खर्च खर्ची घालण्यात यावा.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २००८०५१६१११५२१००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(आ.श्रा.जिवने)**<br>
शासनाचे अवर सचिव

निर्धार ही सभा व्यक्त करीत आहे. **१० मार्च २००८ चे कार्यासन अधिकाऱ्याचे निषेधार्ह पत्र ताबडतोब मागे घेण्यात यावे अशी मागणी करीत आहे.**

**(क)** दरम्यानच्या काळात प्रत्यक्ष अदा करण्यात आलेल्या कुंठीत वेतनवाढीची 'रिकव्हरी' काढण्याचा प्रयत्न केला जात असेल किंवा करण्यात आला असेल तर संबंधित शिक्षकांनी ताबडतोबीने मा. उच्च न्यायालयासमोर ही बाब नेवून **'स्टे' किंवा 'स्टेटस्को' मिळविण्यासाठी प्रयत्न करावा असाही निर्णय घेण्यात येत आहे.**

*नोटस् :- (1) Letter No.37-(16)/02-per.IV of D.K. Chhatwal, Under Secretary (IC-II) Government of India Ministry of Agriculture, Department of Agricultural Research & Education Krishi Bhawan, New Delhi : Dated : 8th August, 2006 to, The Principal, Anand Niketan College of Agriculture, District Chandrapur (M.S.) - 442 914, About Stagnation Increment was circulated on page No 44 of 2008 NUTA Bulletin*

*(2) Letter No. F-2-11/2001 (PS) October, 2006 by Mrs. Shashi Munjal, Under Secrectary University Grants Commission Bahadur Shah Zafar Marg New Delhi 110 002 to Dr. M.Y. Palarpawar, Principal, Anand Niketan College of Agriculture Anandwan - Warora, Dist. Chandrapur (M.S.) - 442 914. About Stagnation Increment was circulated on page No 44 of 2008 NUTA Bulletin*

*(३) "सुधारित वेतनश्रेणीच्या कमाल वेतनावर कुंठीत झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना कुंठीत वेतनवाढी मंजूर करणेबाबत" महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय, क्रमांक : १०९९/प्र.क्र.१/९१ सेवा-३ मंत्रालय, मुंबई, दिनांक २५ जानेवारी १९९९ सन २००८ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ ४६ वर प्रसृत केला आहे.*

*(४) "सुधारित वेतनश्रेणीच्या कमाल वेतनावर कुंठीत झालेल्या कर्मचाऱ्यांना कुंठीत वेतनवाढी मंजूर करणेबाबत विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील कर्मचारी." महाराष्ट्र शासन : उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय : एनजीसी १३९५/६१२८५/(३१६७) विशि-४ मंत्रालय विस्तार भवन, मुंबई दिनांक १४ सप्टेंबर १९९९ सन २००८ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ ४६ वर प्रसृत केला आहे.*

*(५) विद्यापीठीय व महाविद्यालयीन अध्यापकांना कुंठीत वेतनवाढी मंजूर करण्यासंबंधी मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांचे निर्देश क्र. शिसं/उशि/म.रा./कुंठीत वेतन/०३/१३०० शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण : महाराष्ट्र राज्य, पुणे-१ दिनांक १५.११.२००३ सन २००८ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ ४७ वर प्रसृत केला आहे.*

*(६) "वेतनश्रेणीच्या कमाल वेतनावर कुंठीत झालेल्यांना कुंठीत वेतनवाढ मंजूर न करणे" महाराष्ट्र विधानपरिषद तिसरे अधिवेशन २००७ शुक्रवार, दिनांक ३० नोव्हेंबर, २००७ अ.ता.प्र.क्र. ३६५६८ चे उत्तर सन २००८ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ ४७ वर प्रसृत केले आहे.*

*(७) "सुधारित वेतनश्रेणीच्या कमाल वेतनावर कुंठीत झालेल्या कर्मचाऱ्यांना कुंठीत वेतनवाढ मंजूर करणेबाबत" या विषयावरील कार्यासन अधिकारी महाराष्ट्र शासन उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई यांचे दिनांक : १० मार्च २००८ चे पत्र क्रमांक एनजीसी-२००८/(७०/०८)/विशि-४ सन २००८ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ ५८ वर प्रसृत केले आहे.*

## विषय क्रमांक ४६६ :
## *पाचव्या वेतन आयोगाच्या वेतनत्रुटी व वेतन असमानता बाबतचे प्रस्ताव विचारात न घेण्याचा शासननिर्णय*

"केंद्र शासनाने सहावा वेतन आयोग नेमलेला असल्याने राज्य शासकीय कर्मचारी आणि इतर कर्मचाऱ्यांच्या पाचव्या वेतन आयोगाच्या वेतनत्रुटी व वेतन असमानता बाबतचे प्रस्ताव विचारात न घेण्याबाबत" या विषयावरील महाराष्ट्र शासनाने निर्गमित केलेले दिनांक ५ मार्च, २००७ रोजीच्या परिपत्रक क्रमांक वेपूर-१२०७/प्रक्र.२/२००७/सेवा-९ ची **नोंद घेण्यात आली.**

**नोट** *:- "केंद्र शासनाने सहावा वेतन आयोग नेमलेला असल्याने राज्य शासकीय कर्मचारी आणि इतर कर्मचाऱ्यांच्या पाचव्या वेतन आयोगाच्या वेतनत्रुटी व वेतन असमानता बाबतचे प्रस्ताव विचारात न घेण्याबाबत" या विषयावरील महाराष्ट्र शासनाने निर्गमित केलेले दिनांक ५ मार्च, २००७ रोजीचे परिपत्रक क्रमांक वेपूर-१२०७/प्रक्र.२/२००७/सेवा-९ सन २००८ नुटा बुलेटीनच्या पृष्ट क्रमांक ५३ वर दिलेले आहे.*

## विषय क्रमांक ४६७ :
## *नुटा पदाधिकाऱ्यांची मा. शिक्षण सहसंचालकांशी झालेली बैठक*

मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती विभाग, अमरावती यांच्याशी नुटा पदाधिकाऱ्यांच्या दि. २३.४.२००८ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त व त्या इतिवृत्तासोबत प्राप्त झालेली सहपत्रे यांची **नोंद घेण्यात आली.**

**प्रा.बी.टी.देशमुख,**
विधानपरिषद सदस्य
३, सुबोध कॉलनी,
विदर्भ महाविद्यालयाजवळ,
**अमरावती. - ४४४ ६०४**

दिनांक : १४.०९.२००७
क्रमांक : विपसवे / १०२
फोन नं. नि. २५३००८०
का. २६६३६४६

प्रति,
**सचिव**, 'नुटा'

मा. महोदय,

स.न.वि.वि.

जलसिंचन प्रकल्पांच्या बाबतीत सर्व समाजाने, लोकप्रतिनिधींनी व शासनाने समोर येवून खंबीरपणे प्रकल्प बाधितांच्या सहाय्यासाठी धावले पाहिजे. लक्षावधी लाभधारकांनी या सर्व प्रकरणी मूक प्रेक्षकांची भूमिका न घेता ठामपणे प्रकल्पबाधितांच्या पाठीशी उभे राहिले पाहिजे, ते इतके की अत्यंत अल्पकाळात सर्व शासननिर्णयांनी देऊ केलेले सर्व लाभ प्रकल्पबाधितांना मिळावेत व त्यांच्यात आनंदाचे वातावरण निर्माण होऊन आपणच खरे लाभधारक आहोत अशी भावना त्यांच्या मनामध्ये निर्माण झाली पाहिजे. महाराष्ट्राचा इतिहास असे सांगतो की, असे ज्या ज्या ठिकाणी झाले तेथे मोठमोठे सिंचन प्रकल्प २ किंवा ३ वर्षात, जास्तीत जास्त ४ किंवा ५ वर्षात उभे राहिले. याच्या उलट जेथे लक्षावधी लाभधारकांनी मूक प्रेक्षकांची भूमिका घेतली व काही शेकड्यात असलेल्या प्रकल्प बाधितांना वाऱ्यावर सोडून दिले, हा त्रास फक्त आपल्याच नशिबी आहे, कोणीहि आपल्या पाठीशी नाही अशी भावना त्यांच्या मनामध्ये निर्माण झाली तेथे एक प्रकल्प पूर्ण होण्याला ५० वर्षेसुद्धा कमी पडतात याचीही महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये नोंद आहे. विदर्भाच्या दप्तरात तर अशा अनेक नोंदी आहेत.

२. विदर्भातील फार मोठे क्षेत्र खारपाणपट्ट्यामध्ये आहे. या क्षेत्रामध्ये प्रकल्पस्थळ उपलब्धच होत नाही. असे असतांना निम्न पेढी प्रकल्पासाठी उत्तम प्रकल्पस्थळ उपलब्ध झाल्यानंतर काही मोजके लोक या प्रकल्पाला विरोध करीत आहेत. **प्रकल्पबाधितांनी स्वेच्छेने सरळ खरेदी दिली असा एकही जलसिंचन प्रकल्प विदर्भात यापूर्वी झाला नाही. त्यामुळे मिळणारे लाभ प्रकल्प बाधितांना मिळत नाहीत. परिणामी असंतोष वाढत रहातो. संघटनेच्या धोरणात्मक निर्णयाला अनुसरुन "असामान्य गुणवत्तेचा निम्न पेढी प्रकल्प" असा एक नुटा बुलेटीनचा विशेषांक प्रकाशनाच्या अंतिम टप्प्यामध्ये आहे.** या प्रकाशनामुळे वस्तुस्थिती लोकांच्या समोर येईल व शेकडोंच्या संख्येने प्रकल्प बाधित व्यक्ती स्वेच्छेने सरळ खरेदी पद्धतीने शासनाला प्रकल्पासाठी जमिनी उपलब्ध करुन देतील, अशी मला मोठी आशा वाटते. स्वेच्छेने सरळ खरेदी पद्धतीच्या एका नव्या इतिहासाला महाराष्ट्राचा भाग असलेल्या विदर्भात त्यामुळे सुरुवात होईल व इतर प्रकल्पांना सुद्धा प्रकल्पबाधितांच्या असंतोषाला तोंड द्यावे लागणार नाही अशी अपेक्षासुद्धा या प्रयत्नामागे आहे.

३. विधानपरिषद सदस्यत्वाच्या माझ्या पाचव्या कार्यकालापैकी सन २००६ हे दुसरे पुर्ण वर्ष (कॅलेंडर ईयर) होय. त्या वर्षातील १२ महिन्यासाठी विधानमंडळ सदस्य या नात्याने मिळालेले वेतन (Salary) मी संघटनेच्या सुपूर्त करण्याचा निर्णय घेतला आहे.

४. संघटनेच्या आपल्या स्वतःच्या स्थायी उद्भवातून मिळणारे नियमित उत्पन्न आपला खर्च भागविण्यासाठी जेमतेम पुरणारे आहे, याची मला जाणीव आहे. अशाही स्थितीत बुलेटीन विशेषांकासाठी सदस्य व शिक्षकांनी दिलेल्या अल्प स्वेच्छाधिन निधी सहभागातून अनुशेष निर्मूलनाच्या कामी खटपट करण्याचे जे धोरणात्मक निर्णय आपल्या संघटनेच्या कार्यकारी मंडळाने व आमसभेने घेतले आहेत त्या निर्णयांची अंमलबजावणी करण्यासाठी किंवा तत्सम कामासाठी अल्पसा हातभार लावण्याच्या भावनेने मी उक्त निर्णय घेतलेला आहे.

आपला विनित

**(बी.टी.देशमुख)**
अध्यक्ष, 'नुटा' विधानपरिषद सदस्य,

**सहपत्र :** पत्राची प्रतिलीपी प्रा. डॉ. शितल तिवारी, कोषाध्यक्ष 'नुटा' यांना समादराने अग्रेषित, सोबत 'कोषाध्यक्ष 'नुटा' यांच्या नावे रुपये २४०००/- (चोविस हजार) साठी काढलेला सेंट्रल बँक ऑफ इंडियाचा रेखांकित धनादेश क्रमांक ०४६२१९१ दिनांकित १४.०९.२००७.

***नोटस् :-*** *(१) डॉ.प्रविण रघुवंशी, सहसचिव, नुटा, अमरावती यांना दिनांक २३.४.२००७ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्त पाठविल्याबाबतचे मा. सहसंचालक उच्च शिक्षण, अमरावती विभाग, अमरावती यांचे पत्र क्रमांक ससं/उशि/लले/०८/१३६५ दिनांकीत २९.०४.२००८ सन २००८ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ ५२ वर प्रसृत केलेले आहे.*

*(२) दिनांक २३.४.२००८ रोजी सायंकाळी ४.०० वाजता मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती विभाग, अमरावती ह्यांच्या दालनात संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीचे इतिवृत्त सन २००८ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ ५२ वर प्रसृत केलेले आहे.*

*(३) शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सेवापुस्तकाची दुय्यम प्रत उपलब्ध करुन देण्याबाबत. सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती विभाग, अमरावती यांचे प्राचार्य, सर्व अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी आणि अध्यापक महाविद्यालये, अमरावती विभाग यांना दिलेले पत्र क्रमांक ससं/उशि/लले/०८/१३३७ दिनांकीत २५.४.२००८ सन २००८ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ ५२ वर प्रसृत केलेले आहे.*

## विषय क्रमांक ४६८ :
## *नेटसेट ग्रस्त प्राध्यापकांच्या प्रलंबित समस्येसंबंधीची सद्यस्थिती*

प्रा.प्रफुल्ल राऊत यांनी मांडलेला पुढील प्रस्ताव **सम्मत करण्यात आला.** :-

"नेटसेट ग्रस्त प्राध्यापकांच्या प्रदिर्घ काळापासूनच्या प्रलंबित समस्येसंबंधी संघटनात्मक पातळीवर सुरु असलेल्या प्रयत्नांच्या सद्यस्थितीबाबत कार्यकारी मंडळाने व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने केलेल्या व करित असलेल्या उपाययोजनाबाबत हे सभागृह **समाधान व्यक्त करीत आहे.**"

***नोटस् :-*** *(१) प्रा.प्रफुल्ल राऊत यांनी आमसभेसमोर मांडण्यासाठी पुढील ठरावाची सूचना दिली होती. :- "नेटसेट ग्रस्त प्राध्यापकांच्या प्रदिर्घ काळापासूनच्या प्रलंबित समस्येसंबंधी संघटनात्मक पातळीवर सुरु असलेल्या प्रयत्नांच्या सद्यस्थितीबाबत"*

*(२) ठराव मांडणाऱ्या सदस्यांचे ठरावात नमूद असलेले मत सभागृहाने ठराव मान्य केल्यास सभागृहाचे मत बनत असल्याने अशा मताची स्पष्टोक्ती हा अशा ठरावाचा अपरिहार्य भाग असतो. हा अपरिहार्य भाग या ठरावात नसल्याने ठराव अस्विकारार्ह ठरत होता.*

*(३) तथापि या ठरावामध्ये महत्वाचा विषय अंतर्भूत असल्याने तांत्रिक कारणावरुन त्यावरील आमसभेतील चर्चा टळू नये असे कार्यकारी मंडळाला वाटल्याने ठराव वरील प्रमाणे दुरुस्त स्वरुपात कामकाज पत्रिकेवर प्रसृत करण्याचा कार्यकारी मंडळाने निर्णय घेतला होता.*

*(४)* नुटा बुलेटीन २००७ च्या पृष्ठ क्रमांक ४३ ते ४६ वर नेटसेट बाबत संघटनेने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल प्रसृत केलेला होता.

***(5)*** *Relevant extracts from the judgement of THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY BENCH AT AURANGABAD in WRIT PETITION NO. :* ***5022 OF 2001 delivered on 20th February 2002*** *are as follows :-*

*"25......* ***If the appointees upto 11th December, 1999 failed to obtain the NET/SET qualifications by December, 2003. Undoubtedly they continued to be unqualified to hold the post of Lecturer and they can not be continued beyond December, 2003.*** *The concession granted by the State Government in this clause is contrary to the Regulations framed by the Commission."*

*(६) मा. मुंबई उच्च न्यायालयाने WP. 5782 of 2001 मध्ये दिनांक १८ एप्रिल २००२ रोजी दिलेल्या निकालात परिच्छेद ४ मध्ये "Since majority of the petitions are being disposed of following the judgment delivered by the Aurangabad bench* ***several contentions raised against the resolution dated 18.10.2001 are not canvassed and are not heard and we therefore hereby direct that the same shall remain open and available for challenge to any party i.e. to the petitioners, management and UGC if and when occasion for such challenge will arise."*** *असे नमुद केले असून परिच्छेद ७ मध्ये " In the event the UGC takes decision adverse to the interests of teachers the management and the University are directed not to act upon it for a* ***period of four weeks from the date of communication*** *by UGC to the college through the University." अशी मुभा दिलेली आहे.*

***७)*** *नेट / सेट बाधीत प्राध्यापकांचा प्रश्न यु.जी.सी. चेअरमन डॉ. थोरात यांच्यासोबत झालेली चर्चा व त्या अनुषंगाने पुढील कार्यवाहीकरीता प्रा.सुधाकर मानकर आयफ्क्टो राष्ट्रीय सचिव यांचे प्रा.सी.आर. सदाशिवन, अध्यक्ष एम्फक्टो यांना दिलेले पत्र क्रमांक १०४/२००८ दिनांकीत ३.५.२००८ सन २००८ च्या इ.एक्स फाईलच्या पृष्ठ क्र. २४ वर प्रसृत करण्यात आले होते. ते आता सन २००८ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ ८२ वर प्रसृत करण्यात आले आहे.*

## ITEM NO. 469 :
## *INCREASE IN DA/DR :*

**NOTED** the following Government Resolutions en-

---

**प्रा.बी.टी.देशमुख,**
विधानपरिषद सदस्य — क्रमांक : विपसवे / १०३
३, सुबोध कॉलनी, — फोन नं. नि. २५३००८०
विदर्भ महाविद्यालयाजवळ, — का. २६६३६४६
**अमरावती.** - ४४४ ६०४ — दिनांक : १२.०५.२००८

प्रति,
**सचिव,** 'नुटा'

मा. महोदय,

स.न.वि.वि.

मा. मुंबई उच्च न्यायालयासमोर सुनावणी झालेल्या २००३ चे रिट पिटीशन क्रमांक ५८७२ मध्ये मा. न्यायालयाने दिनांक ६ मे, २००८ रोजी दिलेल्या निर्णयाची आपणा सर्वांना माहीती झालेली आहे. भारतीय संविधानाच्या खंड ३७१ (२) नुसार भारताच्या मा. राष्ट्रपतींनी काढलेले ९ मार्च १९९४ चे आदेश, त्या आदेशानुसार महाराष्ट्राच्या राज्यपालांनी निर्गमित केलेले आदेश व निदेश यांची अंमलबजावणी न होणे, त्यातून निधी वाटपासारख्या महत्वपूर्ण बाबतीत महाराष्ट्राच्या एकूणच अनुशेषग्रस्त भागाला व मुख्यत्वे विदर्भाला सातत्याने मिळणारी भेदभावपूर्ण वागणूक या सारख्या महत्त्वाच्या मुद्यांचे भवितव्य या याचिकेच्या निर्णयावर अवलंबून होते. भारतीय संविधानाच्या खंड ३७१ (२) अन्वये उपलब्ध झालेल्या यंत्रणेच्या अस्तित्वाच्या निकालाचा महत्वपूर्ण विषय या दाव्यात अंतर्भूत होता हे जेवढे खरे; तेवढेच सतत वाढणाऱ्या अनुशेषामुळे शेकडो शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्याची पाळी यावी, ही जी ग्रहण लागल्यासारखी स्थिती एकूणच अनुशेषग्रस्त भागात व विशेषतः विदर्भात निर्माण झालेली होती त्यातून सुटका होण्यासाठी मदत करु शकणारा 'लहानसा प्रकाश किरण'सुद्धा या याचिकेच्या निमित्ताने आपल्या अस्तित्वासाठी लढत होता हेही खरे आहे.

२. मा. उच्च न्यायालयाने आपल्या निर्णयामध्ये स्पष्टपणे "Under Article 371, there is a special responsibility imposed on the Governor to ensure that there is no backwardness in Vidharbha and Marathwada regions and the same was a constitutional obligation imposed on the Governor, which cannot be frustrated." अशी भूमिका घेतली असून "Governor is fully empowered to make necessary allocation of funds to improve the backward areas like Marathwada and Vidharbha . **The directives of the Governor are binding on the State." असा दिलेला निर्णय अनुशेषग्रस्त विदर्भाला निश्चितच दिलासा देणारा आहे. हा संपूर्ण निकाल विशेष बुलेटीन छापून प्रसिद्ध करण्याचा संघटनेने घेतलेला निर्णय त्यामुळेच स्वागतार्ह आहे.**

३. विधानपरिषद सदस्यत्वाच्या माझ्या पाचव्या कार्यकालापैकी सन २००७ हे तिसरे पुर्ण वर्ष (कॅलेंडर ईयर) होय. त्या वर्षातील १२ महिन्यासाठी विधानमंडळ सदस्य या नात्याने मिळालेले वेतन (Salary) मी संघटनेच्या सुपूर्त करण्याचा निर्णय घेतला आहे.

४. संघटनेच्या आपल्या स्वतःच्या स्थायी उद्भवातून मिळणारे नियमित उत्पन्न आपला खर्च भागविण्यासाठी जेमतेम पुरणारे आहे, याची मला जाणीव आहे. अशाही स्थितीत बुलेटीन विशेषांकासाठी सदस्य व शिक्षकांनी दिलेल्या अल्प स्वेच्छाधिन निधी सहभागातून अनुशेष निर्मूलनाच्या कामी खटपट करण्याचे जे धोरणात्मक निर्णय आपल्या संघटनेच्या कार्यकारी मंडळाने व आमसभेने घेतले आहेत त्या निर्णयांची अंमलबजावणी करण्यासाठी किंवा तत्सम कामासाठी अल्पसा हातभार लावण्याच्या भावनेने मी उक्त निर्णय घेतलेला आहे.

आपला विनित

**(बी.टी.देशमुख)**
अध्यक्ष, 'नुटा' विधानपरिषद सदस्य,

**सहपत्र :** पत्राची प्रतिलीपी प्रा. डॉ. शितल तिवारी, कोषाध्यक्ष 'नुटा' यांना समादराने अग्रेषित, सोबत 'कोषाध्यक्ष 'नुटा' यांच्या नावे रुपये २४०००/- (चोविस हजार) साठी काढलेला सेंट्रल बँक ऑफ इंडियाचा रेखाकिंत धनादेश क्रमांक १०३६२२ दिनांकित १२.०५.२००८.

hancing the DA/DR from 41 percent to 47 percent :-

(a) "राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना दिनांक १ जानेवारी २००८ पासून महागाई भत्ता मंजूर करण्याबाबत" या विषयावरील शासन निर्णय, महाराष्ट्र शासन वित्त विभाग क्रमांक : मभवा ११०८/प्र.क्र. २१/ सेवा-९ मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ : दिनांकीत १६ मे २००८

(b) Government Resolution : GOVERNMENT OF MAHARASHTRA : FINANCE DEPARTMENT No. DRP-1008/66/SER-4 Mantralaya, Mumbai 400 032, dated 16th May 2008, enhancing Dearness Relief on pension/ family pension from 41 percent to 47 Percent.

***Notes :-*** *(a) "राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना दिनांक १ जानेवारी २००८ पासून महागाई भत्ता मंजूर करण्याबाबत" या विषयावरील शासन निर्णय, महाराष्ट्र शासन वित्त विभाग क्रमांक : मभवा ११०८/प्र.क्र. २१/ सेवा-९ मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ : दिनांकीत १६ मे २००८ हा सन २००८ च्या ई-एक्स फाईलच्या पृष्ठ २४ वर प्रसृत करण्यात आला होता. तो आता सन २००८ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ ७६ वर प्रसृत करण्यात आला आहे.*

*(b) Government Resolution : GOVERNMENT OF MAHARASHTRA : FINANCE DEPARTMENT No. DRP-1008/66/SER-4 Mantralaya, Mumbai 400 032, dated 16th May 2008, enhancing Dearness Relief, on pension/family pension from 41 percent to 47 Percent was circulated on page 25 of 2008 Ex-File. Now it is circulated on page 86 of 2008 NUTA Bulletin.*

## विषय क्रमांक ४७० :
## *सिंचनाव्यतिरीक्त ईतर क्षेत्रात असलेला असमतोल दूर करणे तसेच नोकऱ्यांचे समन्यायी वाटप करण्याबाबत निदेश*

प्रा.सुभाष गवई यांनी मांडलेला पुढील प्रस्ताव **सम्मत करण्यात आला:-**

भारतीय संविधानाच्या खंड ३७१ (२) मध्ये असलेली तरतुद ही एक विशेष तरतुद असून महाराष्ट्राच्या विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र या तीनही विभागांचा समतोल विकास व्हावा व होत रहावा यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांवर विशेष जबाबदारी सोपविण्याचे खास अधिकार भारताच्या मा. राष्ट्रपतींना या तरतुदींनी दिलेले आहेत. भारताच्या मा. राष्ट्रपतींनी दिनांक ९ मार्च १९९४ रोजी याबाबतचा आदेश पारित करुन महाराष्ट्राच्या राज्यपालांवर विशेष जबाबदारी सोपविली आहे. या जबाबदारीच्या अनुषंगाने मा. राज्यपालांनी काढलेले निदेश **"भारतीय संविधानाच्या मुलभूत रचनेला छेद देणारे आहेत" हा युक्तीवाद मा. उच्च न्यायालयाने फेटाळून लावला असून "हे निदेश राज्यावर बंधनकारक आहेत"** असा निर्णय दिला असल्याने, काळाची पावले ओळखून १९५३ साली नागपूर करार करणाऱ्या व त्यातील तरतुदी घटनादुरुस्ती करुन १९५६ साली भारतीय घटनेच्या कलम ३७१ (२) मध्ये आणणाऱ्या, विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्राच्या तत्कालीन नेत्यांच्या दूरदृष्टीवर एका अर्थाने शिक्कामोर्तबच झाले आहे. वाढलेला प्रचंड प्रादेशिक असमतोल लक्षात घेता जलसिंचन या विकासक्षेत्राप्रमाणेच विकासाचा असमतोल असलेल्या इतर क्षेत्रासाठीसुद्धा असेच निदेश निर्गमित करावे, त्याचबरोबर महाराष्ट्रामध्ये उपलब्ध असलेल्या नोकऱ्या व तांत्रिक शिक्षण तसेच व्यावसायिक शिक्षणाच्या जागांचे उपरोक्त तीन भागांमध्ये समन्यायी वाटप **करणारे निदेश महाराष्ट्राच्या मा. राज्यपालांनी निर्गमित करावे अशी मागणी हे सभागृह करित आहे व त्याना तशी विनंती करित आहे.**

***नोटस् :-*** *(१) भारतीय संविधानाचे कलम ३७१ (२) सन २००८ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ क्रमांक ६१ वर उद्धृत करण्यात आले आहे.*

*(२) मा. उच्च न्यायालयाने दिनांक ६ मे २००८ रोजी दिलेला निर्णय सन २००८ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ क्रमांक ६४ ते ७२ वर प्रसृत केला आहे.*

## विषय क्रमांक ४७१ :
## *ॲड. श्रीहरी अणे यांचे अभिनंदन व आभार*

प्रा.डॉ.प्रविण रघुवंशी यांनी मांडलेला पुढील प्रस्ताव **सम्मत करण्यात आला.**

सन २००३ च्या याचिका क्रमांक ५८७२ मध्ये मुंबई उच्च न्यायालयासमोर विदर्भ व मराठवाड्याची बाजू समर्थपणे व यशस्वीपणे मांडल्याबद्दल जेष्ठ अधिवक्ता ॲड. श्रीहरी अणे यांचे ही सभा हार्दिक अभिनंदन करीत आहे. संघटनेच्या कोषाध्यक्ष व सचिवांनी दिनांक १८ सप्टेंबर २००६ च्या पत्रान्वये ॲड. श्रीहरी अणे यांना "आपल्या सारख्या समर्थ ज्येष्ठ अधिवक्त्यांनी या प्रकरणी अनुशेषग्रस्त भागाची बाजू मांडण्याचे मान्य केले आहे, त्यामुळे विदर्भातील लोकांना मनापासून आनंद झालेला आहे व आपली बाजू निश्चितच प्रभावीपणे मांडली जाईल या खात्रीपोटीच हा आनंद आहे, हे नमूद करणे आम्हाला आवश्यक वाटते. भारतीय संविधानाच्या खंड ३७१ (२) अन्वये उपलब्ध झालेल्या यंत्रणेच्या अस्तित्वाच्या निकालाचा महत्वपूर्ण विषय या दाव्यात अंतर्भूत आहे हे जेवढे खरे; तेवढेच सतत वाढणाऱ्या अनुशेषामुळे शेकडो शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्याची पाळी यावी, ही जी ग्रहण लागल्यासारखी स्थिती एकूणच अनुशेषग्रस्त भागात व विशेषतः विदर्भात निर्माण झालेली आहे, त्यातून सुटका होण्यासाठी मदत करु शकणारा 'लहानसा प्रकाश किरण'सुद्धा या याचिकेच्या निमित्ताने आपल्या अस्तित्वासाठी लढत आहे हेही खरे आहे." असे कळविले होते व त्याच पत्रात त्यांना "आज न्यायालयासमोर असलेल्या अशा याचिकांमध्ये फार मोठा आर्थिक भार सहन करावा लागतो हे सर्वविदीत आहे. अशा आर्थिक भारामध्ये ज्येष्ठ अधिवक्त्यांचा मेहनताना व येणारा अनुषंगिक खर्च (कनिष्ठ सहकारी अधिवक्त्यांच्या मेहनतान्यासह) या दोन प्रमुख बाबी असतात अशी आमची समजूत आहे. हा आर्थिक भार उचलण्यात सर्वांनी हातभार लावला पाहिजे अशीही आमची धारणा आहे. ज्येष्ठ अधिवक्ता या नात्याने मेहनतान्याविषयी आपण घेतलेली भूमिका आमच्या संघटनेचे अध्यक्ष प्रा.बी.टी.देशमुख व अनुशेष समस्येचे जाणकार ॲड. मधुकरराव किम्मतकर यांच्याकडून समजली. या एकूण आर्थिक भारातील अल्पसा सहभाग म्हणून रुपये २५ हजार आपणाकडे सुपूर्त करण्याचा निर्णय आमच्या संघटनेच्या कार्यकारी मंडळाने घेतला आहे. कृपया स्वीकार व्हावा" अशी विनंती केली होती. ॲड. श्रीहरी अणे यांना मुंबई उच्च न्यायालयात या रकमेचा रेखांकित धनादेश प्रा.बी.टी.देशमुख, ॲड. मधुकरराव किंमतकर यांनी दिला असता त्यांनी संघटनेचे पत्र ठेवून घेतले पण रेखांकित धनादेश नम्रतापूर्वक परत केला. निष्णात कायदेपंडीत असलेल्या विदर्भाच्या या थोर सुपुत्राने आपल्या या लहानशा कृतिने सामाजिक हितबुद्धीच्या जोपासनेचे जे दर्शन घडविले ते खचितच स्पृहणीय आहे. प्रादेशिक असमतोलाने होरपळून निघालेल्या विदर्भ मराठवाड्यातील लोकांच्या वतीने ही सभा त्यांच्याप्रती अनन्यसाधारण आदरभाव व्यक्त करीत आहे व त्यांचे आभार मानित आहे.

***नोटस् :-*** *(१) ॲड.श्रीहरी अणे यांना संघटनेच्या कोषाध्यक्ष व सचिवांनी पाठविलेले पत्र सन २००८ ई-एक्स फाईलच्या पृष्ठ २८ वर प्रसृत केलेले होते. ते आता सन २००८ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ ७५ वर प्रसृत करण्यात आले आहे.*

## विषय क्रमांक ४७२ :
## *अनुशेष विषयक प्रश्नांच्या मांडणीसाठी नुटा बुलेटीनचे योगदान*

डॉ.एकनाथ कठाळे यांनी मांडलेला पुढील प्रस्ताव **सम्मत करण्यात आला. :-**

"हा दिर्घमुदतीचा, चिकाटीने व चिवटपणे चालणारा लढा आहे. कोरडवाहू शेतकऱ्यांवर आलेल्या अभूतपूर्व संकटसमयी ते संकट परतवून लावण्यासाठीच्या धडपडीला सातत्यपूर्ण सक्रीय पाठिंबा देण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून कृषिविषयक व अनुशेष विषयक प्रश्नाविषयी लोकमानसामध्ये जाणीवा व जागृती निर्माण करण्याच्या हेतूने 'नुटा बुलेटीन'च्या माध्यमातून यापुढील काळात सकस प्रयत्न सातत्याने करण्यात यावे **असा धोरणात्मक निर्णय घेण्यात येत आहे.** संघटनेच्या कामाचा एक भाग समजून अशा आंदोलनाची वैचारिक बैठक बांधण्यामध्ये व्यवसायाने शिक्षक असलेले सदस्य, अशा सदस्यांची संघटना, अशा संघटनेचे मुखपत्र यांनी पार पाडावयाची कामगिरी यांचा **एक नवा अध्याय या धोरणात्मक निर्णयामुळे सुरू करण्याचा विचारपूर्वक निर्णय घेण्यात येत आहे."** असा निर्णय नुटाच्या आमसभेने सन २००६ मध्ये विषय क्रमांक ४२९ अन्वये घेतला होता.

वैचारिक योगदानाच्या या कामामध्ये संघटना आणि संघटनेचे मुखपत्र गेली अनेक वर्ष कार्यरत आहे. कार्यकारी मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार सुरुवातीला जाहिराती गोळा करुन विशेषांकासाठी लागणारा खर्च भागविण्यात येत असे. वारंवार अशा कामासाठी जाहिराती गोळा करण्याचे हे काम बरेच दगदगीचे वाटल्याने पुढे शिक्षकांनी दिलेल्या स्वेच्छाधीन आर्थिक सहभागातून असा 'विशेषांक निधी' काढून हा खर्च भागविला जावू लागला.

वित्त खात्याने एका मागून एक अनेक शासननिर्णय काढून विदर्भातील नव्या प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता न देण्याचा जो कट केला होता तो नुटा बुलेटीनने उघड केला. परिणामी ते सर्व शासननिर्णय शासनाला रद्द करावे लागले. प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात जाणाऱ्या जमिनी स्वेच्छेने सरळ खरेदी

पद्धतीने शासनाच्या स्वाधिन करण्याच्या एक नव्या अध्यायाला विदर्भात सुरुवात झाली ती निम्न पेढी प्रकल्पाच्या निमित्ताने. आज बुलढाणा जिल्ह्यातील जिगाव व यवतमाळ जिल्ह्यातील निम्न पैनगंगा प्रकल्पामध्ये व इतर अनेक प्रकल्पांमध्ये शेकडो शेतकरी स्वेच्छेने सरळ खरेदी देवून जमिनी शासनाच्या स्वाधिन करीत आहेत. निम्न पेढी प्रकल्पाच्या विशेष बुलेटीनमुळे खारपाण पट्ट्याच्या भागात एका नव्या इतिहासाला सुरुवात झाली आहे. नुटा बुलेटीन या मुखपत्राच्या कामगीरीविषयी ठरविण्यात आलेल्या धोरणाशी ही सभा सहमती व्यक्त करित आहे.

**नोटस् :-** *(१) सन १९९१ चा कार्यकारी मंडळाचा निर्णय :- १९९१ च्या इएक्स फाईलच्या पृष्ठ क्रमांक ९१ वर नमुद असलेला व विषय क्रमांक ३० वर कार्यकारी मंडळाने मंजूर केलेला ठराव पुढील प्रमाणे आहे. :- "१९९१ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ १ ते २० वर अमरावती महानगरपालिकेच्या अनुदान सूत्राबाबत जो नुटा बुलेटीनचा विशेषांक काढण्यात आला त्याची नोंद घेण्यात आली.अशा प्रकारच्या विशेषांकासाठी येणारा खर्च संघटनेच्या खर्चातून करणे शक्य नसल्यामुळे तो खर्च जाहिरातीच्या माध्यमातून उभा करण्याचा धोरणात्मक निर्णय कार्यकारी मंडळाने यापूर्वीच घेतला होता. याबाबतचा आवश्यक निधी जाहिरातीच्या माध्यमातून उभा करण्यासाठी व हा विशेष अंक यशस्वीरित्या काढण्यासाठी जी मेहनत कार्यकारी संपादक प्रा. आर. चित्तरंजन, अमरावती जिल्हा युनिटचे अध्यक्ष प्रा. एस.बी. चिंचमलातपूरे सचिव श्री. इ. के. ठोंबरे, कोषाध्यक्ष एस.ए.तिवारी, प्रा. अरुण एलगुंदे, प्रा. बी.बी.हेडा व प्रा. अनिल सोमवंशी यांनी घेतलेली आहे त्याबद्दल ही सभा समाधान व्यक्त करित आहे.या निमित्ताने या विशेषांकासाठी आलेला खर्च वजा जाता जाहिरातीमुळे आलेल्यातून उरलेले उत्पन्न हे "नुटा बुलेटीन विशेषांक निधी" असे जे स्वतंत्र खाते काढण्यात आले त्यामध्ये जमा करण्यात यावे व त्या निधीचा वापर अशा प्रकारच्या विकास विषयक प्रश्नांच्या बाबतीत किंवा कार्यकारी मंडळाने ठरविलेल्या विषयांच्या बाबतीत तसेच विधानपरिषदेत करण्यात आलेल्या कामाविषयी माहिती देणारे विशेषांक काढण्याच्या कामीच करण्यात यावा किंवा डी.टी.पी.ची यंत्रणा नुटा बुलेटीनच्या कार्यालयात बसविण्यासाठी किंवा तत्सम कामासाठी करण्यात यावा असेही ठरविण्यात येत आहे."*

*(२) सन १९९२ चा कार्यकारी मंडळाचा निर्णय :- १९९२ च्या इएक्स फाईलच्या पृष्ठ क्रमांक २५ वर नमुद असलेला व विषय क्रमांक २१ वर कार्यकारी मंडळाने मंजूर केलेला ठराव पुढील प्रमाणे आहे. :- " १९९२ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ १ ते ३२ वर विदर्भाच्या जलसिंचनाच्या अनुशेषाबाबत जो नुटा बुलेटीनचा विशेषांक काढण्यात आला त्याची नोंद घेण्यात आली.अशा प्रकारच्या विशेषांकासाठी येणारा खर्च संघटनेच्या खर्चातून करणे शक्य नसल्यामुळे तो खर्च जाहिरातीच्या माध्यमातून उभा करण्याचा धोरणात्मक निर्णय कार्यकारी मंडळाने यापूर्वीच घेतला होता. याबाबतचा आवश्यक निधी जाहिरातीच्या माध्यमातून उभा करण्यासाठी जी मेहनत कार्यकारी संपादक प्रा. आर. चित्तरंजन, नुटाचे उपाध्यक्ष डॉ. शरद कळणावत, प्राचार्य डॅडी देशमुख, प्रा.एस.बी. चिंचमलातपूरे, कोषाध्यक्ष एस.ए.तिवारी, प्राचार्य विष्णू पाटील, प्रा. एम.एम.थारकर, प्रा. आर.के.बीजवे, प्रा. अनिल सोमवंशी प्रा. एस.टी.सांगळे, प्रा. पी.ए. सहस्त्रबुध्दे, प्रा. हरिभाऊ हिवरे व प्रा. व्ही.टी.हजारे यांनी घेतली आहे त्याबद्दल ही सभा समाधान व्यक्त करित आहे. या निमित्ताने या विशेषांकासाठी आलेला खर्च वजा जाता जाहिरातीमुळे आलेल्यातून उरलेले उत्पन्न हे "नुटा बुलेटीन विशेषांक निधी" असे जे स्वतंत्र खाते काढण्यात आले त्यामध्ये जमा करण्यात यावे. व त्या निधीचा वापर अशा प्रकारच्या विकास विषयक प्रश्नांच्या बाबतीत किंवा कार्यकारी मंडळाने ठरविलेल्या विषयांच्या बाबतीत तसेच विधानपरिषदेत करण्यात आलेल्या कामाविषयी माहिती देणारे विशेषांक काढण्याच्या कामीच करण्यात यावा किंवा डी.टी.पी.ची यंत्रणा नुटा बुलेटीनच्या कार्यालयात बसविण्यासाठी किंवा तत्सम कामासाठी करण्यात यावा असेही ठरविण्यात येत आहे.*

*(३) १९९५ चा आमसभेचा निर्णय :- "शिक्षकांच्या समस्यांना अग्रक्रम व शिक्षक हिताच्या कार्यक्रमांना प्राधान्य देत असतांनाच व्यापक सामाजिक हिताचे प्रश्न विशेषतः प्रदेशाच्या विकासाचे, अनुशेषाचे – मग तो रस्त्याचा असेल जलसिंचनाचा असेल, किंवा अन्य विकासक्षेत्रातील असेल – जे प्रश्न वेळोवेळी निर्माण होतील त्यांचे निराकरण करण्यासाठी संघटनेच्या नुटाबुलेटीन या मुखपत्राचा प्रभावशाली वापर होऊ शकतो. नुटा बुलेटीनच्या माध्यमातून हे प्रश्न हाताळतांना त्यासाठीचा आर्थिक बोजा संघटनेवर येणार नाही याची दक्षता घेऊन विकासविषयक प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी त्यावर विधानपरिषदेत झालेल्या चर्चा व शासनाची भुमिका लोकांसमोर आणण्यासाठी नुटा बुलेटीन या मुखपत्राचा वापर करण्याबाबतच्या कार्यकारी मंडळाच्या धोरणाला ही सभा भक्कम पाठिंबा व्यक्त करित आहे." (सन १९९५ चे नुटा बुलेटीन पृष्ठ क्रमांक ३५, विषय क्रमांक १८०/४)*

*(४) **(अ)** अध्यक्ष प्रा. बी.टी.देशमुख यांनी संघटनेच्या सचिवांना लिहिलेले दिनांक १६ सप्टेंबर २००६ रोजीचे पत्र क्रमांक विपसवे / १०१ सन २००८ च्या ई-एक्स फाईलच्या पृष्ठ २८ वर प्रसृत केलेले होते. ते आता सन २००८ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ ७६ वर प्रसृत करण्यात आले आहे. **(ब)** अध्यक्ष प्रा. बी.टी.देशमुख यांनी संघटनेच्या सचिवांना लिहिलेले दिनांक १४ सप्टेंबर २००७ रोजीचे पत्र क्रमांक विपसवे / १०२ सन २००८ च्या ई-एक्स फाईलच्या पृष्ठ २६ वर प्रसृत केलेले होते. ते आता सन २००८ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ ७७ वर प्रसृत करण्यात आले आहे. **(क)** अध्यक्ष प्रा. बी.टी.देशमुख यांनी संघटनेच्या सचिवांना लिहिलेले दिनांक १२ मे २००८ रोजीचे पत्र क्रमांक विपसवे / १०३ सन २००८ च्या ई-एक्स फाईलच्या पृष्ठ २७ वर प्रसृत केलेले होते. ते आता सन २००८ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ ७८ वर प्रसृत करण्यात आले आहे.*

## विषय क्रमांक : ४७३
## श्री वसंतराव खोटरे यांची उमेदवारी :

यानंतर अध्यक्षांनी दिनांक ४ मे, २००८ रोजी कार्यकारी मंडळाने एकमताने घेतलेल्या **पुढील निर्णयाची सभागृहाला माहीती दिली. :-**

"महाराष्ट्र राज्याच्या विधानपरिषदेवर एक सदस्य निवडण्यासाठी सन २००८ या वर्षात अमरावती विभाग शिक्षक मतदार संघामध्ये होत असलेल्या निवडणूकीमध्ये पाठींबा देण्यासाठी संघटनेकडे विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या अध्यक्षांनी दिनांक २५ फेब्रुवारी २००८ रोजी, विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या उपाध्यक्षा यांनी दिनांक २७ फेब्रुवारी २००८ रोजी, विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या वाशिम जिल्हा अध्यक्षांनी दिनांक २८ फेब्रुवारी २००८ रोजी पाठविलेली समान अर्थाची विनंती करणारी पत्रे विचारात घेण्यात आली व **वसंतराव दादाराव खोटरे यांना पसंतीचा प्रथम (१) क्रमांक देण्यात यावा असा निर्णय घेण्यात आला.**"

त्यानंतर अध्यक्षांनी श्री. वसंतराव खोटरे यांना निवडून आणण्यासाठी करावयाच्या प्रयत्नांची रुपरेषा स्पष्ट करणारे भाषण केले. श्री. वसंतराव खोटरे यांना निवडून आणण्यासाठी **संघटनेतर्फे सर्वतोपरी प्रयत्न करण्याचा निर्धार सभेत व्यक्त करण्यात आला.**

## विषय क्रमांक : ४७४
## गणसंख्या :

नुटाच्या घटनेतील खंड ५ मध्ये असलेल्या तरतुदीनुसार गणसंख्येच्या अभावी सुरुवातीला सभा अर्धा तासासाठी तहकुब करण्यात आली होती, **ही बाब कार्यवृत्तामध्ये नोंदविण्यात येत आहे**, असे अध्यक्षांनी जाहीर केले.

## विषय क्रमांक : ४७५
## सभा व्यवस्थेबद्दल आभार :

कार्यकारी मंडळाच्या वतीने अध्यक्षांनी महाविद्यालयाचे प्राचार्य व स्थानिक शाखेच्या इतर प्राध्यापकांनी, जिल्हा नुटाचे अध्यक्ष, सचिव व सदस्य यांनी, ही सभा यशस्वी करण्यासाठी घेतलेल्या परिश्रमाबद्दल आणि दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे मनःपुर्वक आभार मानले. शेवटी सर्व उपस्थित सदस्यांचे आभार मानून **सभा संपली असे अध्यक्षांनी जाहीर केले.**

| | |
|---|---|
| स्वा / **बी.टी.देशमुख** | स्वा / **एकनाथ कठाळे** |
| ***अध्यक्ष*** | ***सचिव*** |

*****

**No.CIM/ 25 :** **: Dated 27th June 2008**

**CORRECTION**
**in the copy of the Minutes**
**of the General Body Meeting of NUTA**

Copy of the Minutes of the General Body Meeting of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION held at 12.00 noon on Sunday, the 25 th May, 2008 at G.S. Science, Arts & Commerce College, KHAMGAON is circulated in this NUTA Bulletin.

If you propose to suggest any correction to the Minutes, it may be pointed out to the Secretary (Prof.E.H.Kathale, Secretary, NUTA, N-162, Reshim Bagh, Nagpur-440 009.) by letter within 10 days from the date of posting of this Bulletin.

It will not be possible for the corrections received after the due date to be included in the List of corrections for consideration.

Please send one copy of your letter to Prof. B.T.Deshmukh, President NUTA, 3, Subodh Colony, Near Vidarbha Mahavidyalaya, Amravati. 444 604.

**- Dr. E.H. Kathale,** ***Secretary, NUTA***

**MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS**
*(Registered under the Trade Union Act, 1926 No. By -II-8162 of 2985)*

**Affilated to the All India Federation of University & College Teachers' Organizations**
**University Club House, B-Road, Churchgate, Mumbai 400 020**

# MFUCTO MEMORANDUM

## For Consideration of the UGC Pay Review Committee (VIth Pay Commission)

Presented by the MFUCTO
on behalf of University and College Teachers in the State of Maharashtra

## AT PUNE ON FRIDAY 6TH JUNE 2008

To,

The Chairman & Members of the UGC Pay Review Committee (Sixth Pay commission) Camp, Pune University PUNE.

Hon'ble Chairman and Members :

**1. About ourselves :**

Maharashtra Federation of University and College Teachers Organization (MFUCTO) is the State level recognized Organisation of teachers in the State of Maharashtra having come into existence in 1976. It represents the entire teaching community falling under the juridiction of Non-Agricultural Universities in the State, viz.. University of Mumbai, University of Pune, University of Nagpur, University of Amravati, Shivaji University (Kolhapur) Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad, SNDT Women's University, North Maharashtra University, Swami Ramanand Tirth University, Nanded.

**2. The Educational Scenario :**

2.1 Since the last pay Commission and the UGC Pay Review Committee submitted their Reports, various developments have taken place. It would be appropriate therefore this Hon'ble committee to take stock of those developments.

2.2 Privatization of Higher Education has taken place in a big way more particularly after the new policy of Privatization, Liberalization and Globalization was announced and adopted by the Government of India in 1991. The Teachers Organizations through out the country led by the All India Federation of University and College Teachers Organization (AIFUCTO) had expressed its fears that education being an important social service sector should not be recklessly thrown open to privatization. In fact the example of unaided institutions already established in Maharashtra from 1985 and the loot of students and parents in the forms of capitation fee and donations was before us plainly indicating that education was getting more and more money and market oriented and allowed to the rich who can afford to buy.

2.3 Today the situation has worsened. Educational institutions are started by persons whose main concern is the money that could be spun out of the institutions and education is only incidental. Higher Education has suffered in this process and many institutions have come to be owned, controlled and operated by undesirable elements. These institutions under the self financing categories are getting more and more independent in their functioning and the apex bodies such as the UGC, AICTE, and so on including the Universities with which they are affiliated are losing regulatory controls..

**3. Counting of service :**

3.1 University and College teachers fall under the category of central services being within the jurisdiction of the UGC and the orders of the Union HRD Ministry. The various Education Commissions have emphasized that teachers should be selected through a process of national selection not only attracting the best national talent but retaining them in the education sector. The teachers working anywhere in the country therefore form one class of professional and take up teaching assignments in the different parts of our vast country from Kashmir to Kanyakumari and Guahati to Goa. Their entire service has to be counted for all purposes including giving to them increments, placement benefits in the senior scale and selection grade, pension, gratuity and so on.

3.2 Though the previous Committees of the UGC viz., the Mehrotra Committee and the Rastogi Committee have emphasized this aspect in all its importance, even today this is not being granted to teaching community. When teachers leave one State and join another State, they are being trated as new entrants and their past service is not counted for the purpose of their pension and gratuity. The difficulty expressed by State Governments is that there is no work out as yet of the share of financial liabilities between the States. Though Rastogi committee hasd made it clear that the central government should convene meetings of the State Education Ministries to work out a scheme of sharing of the liabilities. Nothing has so far emerged in this respect. The national character of the teaching service is therefore lost into "State' service and the teaching community is left to suffer.

**4. The post of professor in the colleges :**

4.1 It has been accepted that research has to be a part of the academic duty of teachers even in the affiliated colleges, In most of such colleges even PG teaching has now been introduced. There are several subjects where even the entire PG teaching is conducted at the colleges only because the Universities do not have Departments in respect of such subjects. For instance, in the University of Mumbai, Botany and Zoology as branch of biological sciences is taught at the college levels only for M.Sc. Degree and there is no department for these two subjects. It is also a fact that a good many of the teachers working in affiliated colleges are engaged in research and have enrolled students for M.Phil and Ph.D. Degrees and quite a few teachers are engaged in post doctoral research. The colleges have provide infra-structural facilities to such teachers.

4.2 In view of these developments, the AIFUCTO and other State level Teachers Organizations had made forceful presentation with justification to the Rastogi pay Commission that the post of professor has become relevant in the affiliated colleges and that such posts should be permitted to be evolved from within the system or created with the avowed objective of research being extended to the colleges beyond the portals of the University. The traditional idea of the University alone as centers of research has now to give way to the new concept research at the college levels. The UGC had accepted this idea as its aim was also extension of research through the affiliated colleges recognized by the UGC. While holding discussion with the then UGC Chairperson, Dr. Armity Desia, it was made clear by the AIFUCTO that the post of professor being the highest academic post, no compromise on quality should be made and that the organization would want the post to be filled in by the colleges through the UGC laid down selection process with 3 subject experts drawn from the national stream including an observer of the UGC to oversee that the selections and appointments are made keeping in mind academic considerations. Though the UGC had accepted this proposal and the Rastogi Committee was not averse to the idea and made recommendations in respect of the post of professor in colleges.

4.3 However since in spite of these developments in favour of the post of professor being introduced in the affiliated colleges, the HRD Ministry did not introduce proper Orders in that respect. The HRD Ministry toyed with the idea of

creating 100 posts of professors and restrict the same to the autonomous colleges only. This was not in the letter and spirit of the understanding arrived at with the UGC and the HRD Officials some time in October December 1998 and thereafter. The AIFUCTO therefor took up this matter with the HRD Ministry even by holding talks with the HRD Minister, Shri. Arjun Singh and also with the Hon'ble prime Minister, Dr. Manmohan Singh. The matter was fully and correctly understood and it was agreed that the issue would be put up for cabinet decision. The matter is still pending. It is in view of this situation that the MFUCTO is praying that the UGC pay Review Committee should go into this aspect in full and recommend the post of professor to be brought into the establishment of the affiliated colleges in the interest of research expanding.

**5. Stagnation increment :**

5.1It was a well known fact that the scale spread being limited during the period of time when the fifth pay commission scales were introduced from 1.1.1996 and also with additional increments to teachers for Ph.D.. and also the fixation benefit of Rs. 14,940 on completion of 5 years in the selection grade, teachers reached the maximum in the selection grade viz., the point of Rs. 18,300/- Some of them have completed even as many as 4-5 years having reached the maximum in the scale and are stagnating without increments being released to them. Similar was the situation with the central and state government employees and officers. However, the provision of stagnation increment was introduced to remove stagnation at the maximum of the scale. Government orders were released and for every two increments lost one increment has come to be given.

5.2 The Government orders did not mention the teachers and therefore teachers all over the country were denied the benefit of stagnation increment. The UGC was moved by the AIFUCTO and after discussion, the UGC came out with clear-cut orders on stagnation increment. However, in Maharashtra in spite of these favorable developments, the stagnation increment is denied to teachers because the Government Resolution does not mention the category of University and College teachers'. This is a serious anomaly and gross injustice to teachers who are in fact the very senior teaches. This injustice is further extended by the Government of Maharashtra ordering recovery of stagnation increments already given to teachers in Maharashtra in some of the universities. While the Sixth Pay Commission recommendations have made it clear that there would be no stagnation of any category of employees in the country which would apply in the future, the anomalous situation of teachers in the Universities and Colleges in Maharashtra (and may be in some other states in India) continues Which needs to be remedied by this pay review committee. Failure to do this would mean that while fixation is done in the new revised scales off pay that will come under the Sixth Pay Commission recommendations as accepted by this Committee, teaching community in Maharashtra would suffer in no uncertain terms.

**6. Privatization of pension :**

6.1 Pension is being virtually done away with for new teachers appointed on or after 1st November 2004. Pension being one of the most important social security measures that needs to be strengthened because it is to go to the senior citizens in a society where life expectancy is expanding and where neglect of senor citizens is otherwise taking place even at the family levels, this Committee should make strong recommendations for pension and Gratuity being continued for all in the education sector.

6.2 This Committee should also make strong recommendations against the contractual appointments in permanent teaching posts because contractual appointments would be detrimental to the interests of the students, parents and the society at large apart from being highly unacademic and unprofessional nature. The withdrawal of pension for newly appointed teachers is also paving the way for contractual appointments to teaching posts.

**7. Leave package :**

7.1 The UGC pay Review Committee's recommendations on the uniform leave package for all University and College teachers has not so far been implemented in Maharashtra. The leave package provisions were mandatory for the state governments. The leave package ensures that the young teachers more particularly the SC/ST and Other Backward Class categories of teachers and also women teachers would get opportunity to pursue further academic progress through the use of FIPs of two years and also three years with full pay not only to the teacher concerned but also to the substitute teacher appointed. Leave package should not be looked at a condition of service for teachers but as an opportunity to upgrade the academic qualifications and achievements of the teaching community.

7.2 This Committee should therefore make strong recommendations for the full implementation of the total leave package without any exception whatsoever.

**8. NET/SET :**

8.1 National eligibility Test (NET) was introduced by the UGC and HRD Ministry for teachers in the country as qualification condition by Notification dated 19th September 1991. Thereafter till December 1999 neither NET or SET was introduced in Maharashtra as compulsory entry point qualification for teachers at the recruitment level by the legal instruments. Legal instruments for prescribing qualifications for teachers in Maharashtra is (i) Statute prepared by the University under Section 51(8) of the Maharashtra Universities Act or (ii) by the directions issued by the Vice Chancellor for regulating the matter by the Statutes for the time being to be regulated by the direction under Section 14(8) of the Maharashtra Universities Act or (iii) by the standard Code under Section 8(3) of the Maharashtra Universities Act.

8.2 **A Separate note is attached giving further details.**

6th June 2008

(C.R.Sadasivan), President

(E.H.Kathale ) General Secretary

---

**शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघ (सुटा) कोल्हापूर**

**१७३५, सी, हत्तीमहाल रोड, कोल्हापूर ४१६ ००२**

**फोन नं.** २५४१२३० : **जा.क्र.** १०४/२००८ : **दिनांक** ३.५.२००८

प्रति,
प्रा.सी.आर.सदाशिवन, अध्यक्ष, 'एम्फक्टो', मुंबई
यांना

**विषय** :- नेट/सेट बाधित प्राध्यापकांचा प्रश्न यु.जी.सी. चेअरमन प्रा. डॉ.थोरात यांच्यासोबत झालेली चर्चा व त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही.

महोदय,

'एम्फक्टो' व 'सुटा' च्या वतीने प्रा. संभाजी जाधव यांच्या नेतृत्वाखालील यु.जी.सी. चे चेअरमन डॉ. सुखदेव थोरात यांचेशी १५ एप्रिल २००८ रोजी नवी दिल्ली इथे चर्चा झाली. त्यावेळी शिष्टमंडळातर्फे महाराष्ट्रामध्ये विद्यापीठांच्या परिनियमांच्या व वैधानिक दस्तऐवजाच्या अभावी १९ सप्टेबर १९९१ ची अधिसूचना अंमलात येऊ शकली नाही, ही वस्तूस्थिती स्पष्ट करण्यात आली.

ही वस्तूस्थिती लक्षात घेता, राज्य सरकारने म्हणजे मा. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांनी तशा प्रकारचे पत्र यु.जी.सी.ला लिहिल्यास, संबंधित नेट/सेट बाधित प्राध्यापकांना सूट देण्याबाबत यु.जी.सी. च्या कार्यकारिणी मंडळासमोर विषय ठेवता येईल, असे आश्वासन प्रा.डॉ.सुखदेव थोरात यांनी दिले आहे. सदर प्रश्नाबाबत प्रा. डॉ. सुखदेव थोरात यांचा दृष्टीकोन सकारात्मक दिसून आला. त्या पार्श्वभूमीवर 'एम्फक्टो' ने पुढाकार घेऊन त्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी, ही विनंती आहे.

या संदर्भात चर्चेचा वृत्तांत देण्यासाठी व चर्चेच्या आधारे मा. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांची भेट घेण्याच्या दृष्टीने 'एम्फक्टो'च्या कार्यकारिणीची बैठक बोलवावी, ही विनंती आहे.

दरम्यान मा. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांनाही भेट मिळावी म्हणून आपण पत्र पाठवावे, अशीही विनंती आहे.

आपला
**(प्रा.सुधाकर मानकर)**
'आयफक्टो' राष्ट्रीय सचिव

**टिप** :- १) यु.जी.सी. चेअरमन प्रा. डॉ. सुखदेव थोरात यांच्याकडे चर्चेसाठी गेलेल्या शिष्टमंडळामध्ये 'सुटा' चे अध्यक्ष प्रा.एस.के.मठपती व मी स्वतः असे तीन सदस्य गेलो होतो. प्रा.सदाशिवन यांना तातडीने मुंबईस परत जावे लागल्याने ते शिष्टमंडळामध्ये सहभागी होऊ शकले नाहीत.

२) नियोजन आयोगाचे सदस्य डॉ.भालचंद्र मुणगेकर ह्यांची कोल्हापूर मुक्कामी 'सुटा' च्या शिष्टमंडळाने ह्या प्रश्नाबाबत भेट घेतली होती. त्यावेळी त्यांनी केलेल्या सूचनेनुसार व त्यांचेशी झालेल्या फोनवरील बोलणीनुसार ही भेट घेण्यात आली आहे.

# NOTE

## *SUBMITTED TO THE UGC PAY REVIEW COMMITTEE*
## ON BEHALF OF MFUCTO
## ON ANOMALIES IN THE MATTER OF
## PAY STRUCTURE AND / OR CARRIER ADVANCEMENT
## OPPORTUNITIES TO
## **NET /SET AFFECTED TEACHERS IN MAHARASHTRA**

On behalf of the MFUCTO we heartily welcome you and submit this note with respect to the anomalies occurred while implementing the fifth pay Commission recommendations to the teachers in the State of Maharashtra in respect of NET/ SET affected teachers.

In the office memorandum issued by the University Grants Commission dated September 06, 2007 in para (d) it is specifically mentioned that the Pay Review Committee of UGC has to look into the cases of anomalies, if any, in the matter of pay structure and / or career advancement opportunities for any category of academic staff, consequently on revision of pay scale based on the recommendations of the preceeding Pay Review Committee and to suggest remedial measures, we would like to invite your attention on the anomalies in the matter of Career advancement Opportunities for more than six thousand NET/SET affected teachers in the State of Maharashtra.

1) The Govt. of Maharashtra had implemented the revised pay scales as recommended by UGC and the central Govt. of Fourth pay commission, vide its G.R. No. NGC 1286/1224/ UNI-4 dated 27th February, 1989. The G.R. also prescribed for the recruitment and qualifications for the post of Lecturer, Readers, Professors, Librarians and Physical Education Teachers. Relevant extract prescribing minimum qualification incorporated in the said G.R. was as below.

"Generally the minimum qualification for appointment to the post of lecturer in the scale of pay of Rs. 2200-4000 shall be master's Degree in the relevant subject with at least 55% of marks, or its equivalent grade and good academic record."

This provision was in existence in the universities of Maharashtra till December, 1999.

The relevant part of para 08 of the said G.R.reads as follows :

"Generally the minimum qualifications for appointment to the post of lecturer in the scale of pay of Rs. 2200-4000 shall be masters degree in the relevant subject with at least 55% of marks, or its equivalent grade and good academic record."

2) Para 09 prescribes the mechanism (Selection committee) of recruitment of lecturers. para 09 reads as below :

